महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी
२३५ पेनिनसुला हाऊस, तिसरा मजला, डॉ.दादाभाई नौराजी रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१
फोन २२७०४४००,२२७०३०८६ फॅक्स (०२२) २२७०३०८६
E-mail@mchmumbai.org Web site:www.mchmumbai.org

# कामकाजाची माहिती

परिषदेत आज रोजी एकूण ७७०५१ वैद्यकीय व्यावसायिकांची संख्या असून दर पाच वर्षांनी त्यांचे नोंदणी नुतनीकरण करणे, नाव बदली करणे, पत्ते बदलणे, ना-हरकत प्रमाणपत्र देणे, सत्यता पडताळणी बाबतचा पत्रव्यवहार करणे, नोंदणी रद्द करणे, अतिरिक्त शैक्षणिक अर्हता नोंद घेणे, बाहेरील राज्यातील नोंदणी अर्ज स्वीकारुन त्या अनुषंगाने सत्यता पडताळणी करणे व नोंदणी प्रमाणपत्रे देणे अशा प्रकारची कामे करण्यात येतात. तसेच पदविकाधारकांना डुप्लीकेट पासिंग, डुप्लीकेट मार्कशीटही देण्यात येते.

महाराष्ट्रातील सर्व होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात आंतरवासिय कालावधी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दर सहा महिन्यांनी अंतिम बिएचएमएस परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर तात्पुरत्या नोंदणीचे प्रमाणपत्र देण्यात येते.

दि. ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत परिषदेने केलेल्या कामकाजाचा आढावा खालीलप्रमाणे -

| | दिनांक | ऑनलाईन अर्ज संख्या | जारी केलेली संख्या |
|---|---|---|---|
| कायम स्वरुपी नोंदणी प्रमाणपत्रे | १.१.२०२० ते ३१.१२.२०२० | २१२७ | १२६४ |
| | १.१.२०२१ ते ३०.११.२०२१ | ३२२५ | २८२१ |
| नुतनीकरण | १.१.२०२० ते ३१.१२.२०२० | ६०८४ | ४२५६ |
| | १.१.२०२१ ते ३०.११.२०२१ | ७१६३ | ६२१४ |
| ना-हरकत प्रमाणपत्रे (मॉडर्न फार्माकॉलॉजी) | १.१.२०२० ते ३१.१२.२०२० | १२११ | १२२१ |
| | १.१.२०२१ ते ३०.११.२०२१ | २३०९ | २३०२ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता आणि मागील २ वर्षाची आकडेवारी पाहिली असता सन २०२१ मध्ये कामकाजामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. कोव्हिड १९ च्या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे बरीचशी कामे प्रलंबित होती. ती ही कामे याच कालावधीत पूर्ण करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे सीसीएमपी करिता ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे काम फी भरल्यापासून २४ तासांच्या आत देण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

परिषदेशी निगडीत असलेल्या कामकाजाचे काही वैद्यकीय व्यावसायिकानी फक्त ऑनलाईन अर्ज भरले असून त्याची हार्डकॉपी परिषदेला पाठविल्याचे आढळून येत नाही. तरी ज्या होमिओपॅथिक व्यावसायिकांनी कार्यालयीन कामाशी निगडित असलेली फक्त ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण केली आहे, परंतू परिषदेला हार्डकॉपी पाठविलेल्या नाहीत, अशा सर्व संबंधितांनी कृपया आपला अर्ज आवश्यक कागदपत्रांसह परिषदेला त्वरित पाठवावा, जेणेकरुन आपले काम प्रलंबित राहणार नाही.

ठिकाण - मुंबई
दि.- ३० नोव्हेंबर २०२१

डॉ. सोमनाथ त्रिं. गोसावी
प्रशासक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

डॉ. कैलास स. सोनमनकर
प्रबंधक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी